**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७०५/२०२३**
**निशाणी क्रमांक – १९ लगत**

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.१**
**मी सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,**
**नाव – बंडु सदाशिव बाबर , वय – ३२, व्यवसाय– शेती,**
**राहणार – बेलगाव, ता.कर्जत, जि.अ.नगर**

**साक्षीदार क्रमांक १ यांचा सरतपास सरकारतर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री डी.आर.बाविस्कर यांचेतर्फे शपथेवर सुरु –**

दि.३०.०८.२०२३ रोजी पोलीसांनी मला पंचानाम्यासाठी बोलाविले नव्हते. त्यादिवशी पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून निळ्या ड्रममध्ये असलेले गावठी दारु बनविण्यासाठी लागणारे २०० लीटर कच्चे रसायन व १०० लीटर गावठी हातभट्टीची दारु जप्त केले नव्हते. आता मला पंचनामा दाखविला. त्यावर पंचसाक्षीदार क्र.२ म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. पंचनाम्यासास सही पुरता निशाणी क्रमांक २० देण्यात आला.

**अभियोग पक्षास साक्षीदार मदत करत नसलेने, सरकारी विधीज्ञांचे तोंडी विनंतीवरुन साक्षीदाराला उलटतपासात जसे प्रश्न विचारतात तसे प्रश्न विचारणेची परवानगी दिली.**

हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ३०.०८.२०२३ रोजी सहाय्यक फौजदार श्री. कासार यांनी मला टाकळी खंडेश्वरी येथे बोलवून दारुच्या अड्ड्यावर छापा टाकण्यासाठी पंच म्हणून हजर राहणे विषयी विरचारले. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी व अन्य पंचांसह टाकळी खंडेश्वरी गावात आरोपी सोमा सकट याच्या शेताकडे जाऊन सायंकाळी ०६.०० वाजता छापा टाकला असता त्याठिकाणी आरोपी त्याच्या शेताच्या बांधालगत असलेल्या झाडाच्या आडोशाला दिसला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी त्याला

माझ्यासमक्ष त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव सोमा शिवाजी सकट सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी त्याठिकाणी झडती घेतली असता आरोपीच्या ताब्यात निळ्या ड्रममध्ये असलेले गावठी दारु बनविण्यासाठी लागणारे २०० लीटर कच्चे रसायन प्रति लिटर दर ५० रुपये व १०० लीटर गावठी हातभट्टीची दारु प्रति लीटर दर १०० रुपये असा एकूण रुपये २००००/– किमतीचा मुद्देमाल मिळून आला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी त्याठिकाणी १८० मिलीच्या दोन स्वतंत्र बाटल्यांमध्ये सदर रसायन व गावठी दारु नमुन्यासाठी घेऊन उर्वरीत दारु व रसायन जप्त केले आणि त्याचा जप्ती पंचनामा आमच्या समक्ष केला. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यातील सर्व मजकूर माझ्या समक्ष लिहिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला मदत करण्यासाठी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण**

**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.ए.बी.साळवे यांनी साक्षीदाराचा उलटतपास नाकारला.**

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती.

SHIVAJI N THAPEKAR
Digitally signed by SHIVAJI N THAPEKAR
Date: 2025.07.05 10:37:24 +0530

**स्थळ** : कर्जत.

**दिनांक** : ०५.०७.२०२५

**(एस. एन. थापेकर)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कर्जत.

सदर जबाब मी टंकलिखित केला.

**(व्ही. जी. घोगरे)**

लघुलेखक, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत